# भगिनी निवेदिता प्रतिष्ठान,सांगली या सामाजिक संस्थेच्या कार्याचा आढावा

**श्री. विशाल तानाजी भानुसे** पीएच.डी. संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

E-mail ID: vishalbhanuse100@gmail.com

---

भारतातील समाजसेवेची सुरवात फार प्राचीन काळी झाली परंतू ती केव्हा झाली व कुठे झाली हे नक्की सांगता येणार नाही. व्यक्ती हा समाजशील प्राणी आहे त्याच्या हया भावनेतूनच समाजसेवेचा उगम झाला आणि सेवा केल्याने पुण्य प्राप्ती होते ही भावना उदयास आली. भारतात समाजसेवेची एक उज्वल पंरपरा आहे. समाजसेवेसोबतच समाजकार्य हे सुध्दा भारतात प्राचीन काळापासून चालत आलेले आहे. परस्परांना मदत केल्यामुळेच समाजात बंधूभाव शांतता व सुव्यवस्था टिकून राहिली आहे.समाजकार्य ही एक मदत करणारी क्रिया आहे. या कार्याद्वारे व्यक्ती समूह आणि समुदाय यांच्या समस्या सोडविण्यासाठी मदत केली जाते. समस्या सोडविण्याकरिता समाजकार्यात निश्चित अशी कार्यपध्दती निर्माण केली गेलेली आहे. उदा. व्यक्तिसहाय्य कार्य, समुदाय संघटन, गटकार्य, सामाजिक क्रिया, समाजकल्याण प्रशासन, समाज कार्य संशोधन इत्यादी समाजकार्याद्वारे व्यक्तीला समुहाला कायम स्वरुपात मदत करण्यात येते. या पेपर मध्ये सांगली व मिरज शहरातील भगिनी निवेदिता प्रतिष्ठान,सांगली या सामाजिक संस्थेच्या महिलांसाठी केलेल्याकार्याचा आढावा घेणार आहोत.

समाजातील आर्थिक दुर्बल, उपेक्षित, निराश्रीत, विधवा, बलात्कारीत, कुमारीमाता, गरजू, वाळीत टाकलेल्या महिलांना व बालकांना न्याय मिळवून देण्यासाठी भगिनी निवेदिता प्रतिष्ठान, सांगली ही संस्था गेली अनेक वर्षे कार्यरत आहे. समाजाला निश्चित उपयोग होईल असा ठोस विधायक सर्वसमावेशक कार्यक्रम स्त्रिया स्वतंत्रपणे, उत्कृष्टपणे राबवतात याचे ही संस्था उत्तम उदाहरण आहे. या संस्थेच्या मार्फत भारावून आकृष्ट झालेल्या तरुणीची कार्यशक्ती, स्वार्थत्याग यामधून उत्कृष्ट समाजकार्य घडून आले या संस्थेने समाजातील उपेक्षित स्त्रियांना व बालकांना समाजात स्थान मिळवून दिले.

**स्थापना व इतिहास :**

१९६८-६९ च्या सुमारास काही तरुण, शिक्षित, उत्साही आणि सेवाभावी महिलांनी समाजातील अशिक्षित, गरीब, दुर्बल, ग्रामीण तसेच गरजवंत स्त्रिया आणि बालकांना एका ठिकाणी एकत्र आणण्याचा संकल्प केला. या स्त्रिया पूर्वीपासूनच एकमेकींच्या ओळखीच्या होत्या, परंतु आपापल्या जबाबदाऱ्यांमुळे वेगवेगळ्या ठिकाणी राहत होत्या. तरीही, समाजासाठी काहीतरी करण्याची समान तळमळ त्यांच्या मनात होती. याच उद्देशाने त्या सांगलीमध्ये अधूनमधून भेटून कार्याची दिशा ठरवू लागल्या, ज्यामध्ये त्यांच्या चर्चासत्रांमध्ये कामासंबंधी चर्चा आणि विचारमंथन होत असे.

१९६७ हे वर्ष स्वामी विवेकानंद यांच्या शिष्या भगिनी निवेदिता यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष होते. १८८६ मध्ये भारतात आलेल्या भगिनी निवेदिता मूळच्या आयरिश शिक्षिका होत्या. साध्या कुटुंबात जन्मलेल्या निवेदिता भारतात आल्यानंतर स्वामी विवेकानंदांच्या विचारधारेने प्रभावित झाल्या आणि त्यांच्याच शिष्या बनल्या. पुढे त्यांनी योगी अरविंद आणि ॲनी बेझंट यांच्यासोबत स्वातंत्र्यलढ्यातही सहभाग घेतला.त्यांनी केरळमध्ये मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली, त्यांच्या कार्याने प्रेरित होऊन डॉ. कुसूमताई घाणेकर, कमलाताई जोग, सुधाताई केळकर, डॉ. सुलभा देऊस्कर, लिलाताई शिंत्रे आणि शशिकला कुलकर्णी यांनी त्यांचे विचार आत्मसात केले. या सर्व महिलांनी भगिनी निवेदितांचे जीवनचरित्र वाचले, अभ्यासले आणि त्यांच्या "काम, काम आणि फक्त काम" या ध्येयाने प्रेरित होऊन समाजासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्णय घेतला.

**भगिनी निवेदिता प्रतिष्ठान: समाजकार्याचा प्रेरणादायी प्रवास :**

भगिनी निवेदिता प्रतिष्ठान हे महिलांचे आणि बालकांचे अज्ञान दूर करून ज्ञानप्रसार करणारे एक सेवाभावी संस्थान आहे. या संस्थेने आजवर महिलांसाठी आणि मुलांसाठी अनेक उपक्रम राबवले आहेत आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी केली आहे.

**संस्थेची स्थापना आणि सुरुवातीचे कार्य. :**

१९७१ मध्ये कुसुमताई घाणेकर यांच्या पुढाकाराने प्रतिष्ठानची स्थापना झाली. सुरुवातीला संस्थेने अल्पवेतनधारी कामकाज करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृह सुरू केले. त्याचा विस्तार होत गेला आणि उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींसाठी तसेच शालेय विद्यार्थिनींसाठी शिबिरे, पोषण आहार उपक्रम आणि विविध प्रशिक्षण कार्यक्रम सुरू झाले. वसतिगृहातील मुलींसाठी जेवणाची सोय करण्यासाठी खाणावळ सुरू करण्यात आली.

संस्थेच्या उपक्रमांची वाढ आणि विस्तार :

१९७२ मध्ये सांगलीतील प्रतापसिंह उद्यानासमोर संस्थेने विक्री केंद्र सुरू केले. याच काळात महिला आणि मुलांसाठी विविध प्रशिक्षण व नेतृत्व विकास शिबिरांचे आयोजन करण्यात आले. १९७४-७५ मध्ये पहिली निबंध स्पर्धा घेतली, तर आंतरराष्ट्रीय स्त्री वर्षानिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. ग्रामीण भागातील मुलींसाठी शिबिरे आणि प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेतले गेले.१९७६-७७ मध्ये गोवा, पुणे आणि बोडी येथे मुलांसाठी शिबिरे आयोजित करण्यात आली. महिलांसाठी वृद्धाश्रमाची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यात आली आणि त्यासोबतच अल्पबचत योजना सुरू करण्यात आली. आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थिनींसाठी १९७७-७८ मध्ये पुण्यात पहिले शिबीर घेण्यात आले. १९८०-८१ मध्ये राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमाची सुरुवात झाली. याच सुमारास १०० ठिकाणी जनसहभाग शिबिरे राबवली गेली आणि प्रतिष्ठानचे कार्य महाराष्ट्राच्या बाहेरही पोहोचले. कर्नाटक, आंध्र प्रदेश, गुजरात, उत्तर प्रदेश, गोवा आदी ठिकाणी मागास महिलांसाठी शिबिरे घेण्यात आली. १९८४-८५ मध्ये संस्थापक डॉ. कुसूमताई घाणेकर यांच्या पंचाहत्तरी समारंभानिमित्त संस्थेला २८६ झुलाघर युनिट्सची मंजुरी मिळाली. १९८५ मध्ये देवदासी महिलांच्या पुनर्वसनासाठी आणि प्रशिक्षणासाठी ट्रायसेम उपक्रम सुरू करण्यात आले.१९८६-८९ दरम्यान, संस्थेने मुकबधिरांसाठी विशेष प्रशिक्षण सुरू केले, तसेच झुलाघर शिक्षिका प्रशिक्षण कार्यक्रमात भाग घेतला. १९८८-८९ मध्ये अखिल भारतीय महिला मेळावा आयोजित करण्यात आला आणि विविध ठिकाणी झुलाघर प्रशिक्षण शिबिरे घेण्यात आली.१९८२-८३ मध्ये सांगली आणि पुण्यात अशालेय मुलांसाठी मूलभूत शिक्षण देणारी शिबिरे आयोजित झाली. याच दरम्यान पुण्यात विधी विषयक जमिनीच्या कायदेशीर बाबींवर डॉक्युमेंटरी फिल्मची निर्मिती करण्यात आली.

**संस्थेच्या पुढील टप्प्यातील कार्य :**

१९९० मध्ये कर्नाटकातील कागवाड येथे कन्डेन्सड कोर्स राबवण्यात आला आणि संस्थेने राष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग घेतला. १९९१ मध्ये मिड नर्सिंग कोर्स आणि दिनरंजन केंद्रे सुरू करण्यात आली. सांगली येथे संस्थेने स्वतःची इमारत खरेदी केली आणि मुला-मुलींसाठी कॉम्प्युटर ट्रेनिंग कोर्सेस सुरू केले.१९९२ मध्ये गालिचा विणकाम प्रशिक्षण केंद्रासाठी सरकारी मान्यता मिळाली आणि संस्थेच्या कार्याला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळू लागली. ग्रामीण भागातील महिलांसाठी पिण्याचे पाणी आणि स्वच्छता योजनेअंतर्गत ३० गावांमध्ये उपक्रम राबवले गेले. तसंच, संस्थेच्या अध्यक्षा डॉ. कुसुमताई घाणेकर यांनी त्रिनिदाद येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत महिलांच्या शिक्षणासंदर्भात निबंध सादर केला.

गोरगरीब स्त्रियांना मदत, त्यांच्या मुलांचे पोषण, कामगार महिलांच्या मुलांच्या संगोपनाची जबाबदारी तसेच महिलांच्या सामाजिक उन्नतीसाठी ही संस्था सातत्याने कार्यरत आहे. संस्थेच्या वार्षिक अहवालातून त्यांच्या प्रगतीची दिशा स्पष्टपणे दिसून येते. सुरुवातीच्या उपक्रमांमध्ये मध्यमवर्गीय आणि बुद्धिजीवी महिलांसाठी काही कार्यक्रम होते. मात्र, नंतर पददलित, गरीब आणि अडचणीत असलेल्या महिलांसाठी उपक्रमांची संख्या वाढली. आर्थिक पाठबळाची मर्यादा असूनही संस्थेने समाजकल्याण बोर्डाच्या मदतीने अधिक योजनांचा विस्तार केला. ग्रामीण भागातील महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी संस्थेने विशेष प्रयत्न केले.आज भगिनी निवेदिता प्रतिष्ठान समाजातील दुर्बल, गरजू महिलांसाठी आणि मुलांसाठी आशेचा किरण बनले आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक महिलांचे जीवनमान सुधारले असून शिक्षण, रोजगार आणि सामाजिक प्रबोधनाच्या दिशेने मोठे पाऊल उचलले गेले आहे.

**संदर्भ** :

1.डॉ. सीमा इंदलकर: सांगली मिरज कुपवाड परिसरतील अशासकीय संस्थाचा ऐतिहासिक अभ्यास 1900 ते 2000 (शोध प्रबंध)

2. https://bhagininiveditasangli.org/

3. https://www.sewagatha.org/parivartan-yatra/bhagani-nivedita-pratishthan-sangali

4. https://prahaar.in/2022/02/22/bhagini-nivedita-pratishthan-aadhar-mandir-for-destitute-women/